मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प यशस्वी; दुसरा प्रकल्प लवकरच

## दररोज हजार टन कचऱ्याची विल्हेवाट; वाढत्या कचऱ्यासाठी महापालिकेची पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मोशी येथे उभारण्यात आलेल्या कचऱ्यापासून वीज निर्मिती (वेस्ट टू एनर्जी) प्रकल्पामुळे दररोज एक हजार टन सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जात आहे. हा प्रकल्प यशस्वी झाल्याने आणि वाढत्या लोकसंख्येबरोबरच कचऱ्याचे प्रमाण वाढत असल्याने महापालिकेने सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्प (डीबीओटी) तत्त्वावर दुसरा प्रकल्प उभारण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे भविष्यात कचरा समस्या निर्माण होणार नाही, असा दावा पर्यावरण विभागाने केला.



शहरातील घरोघरचा कचरा संकलित करून मोशीतील डेपोत टाकला जातो. गेल्या ३५ वर्षांपासूनचा कचरा येथे साचला आहे. ८१ एकर क्षेत्रातील डेपोत कचऱ्याचे डोंगर तयार झाले आहेत. हे डोंगर बायोमायनिंगद्वारे हटविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. शहराची लोकसंख्या ३३ लाखांवर पोहोचली असून, दररोज १४०० टन कचरा जमा होतो. कचऱ्याची समस्या गंभीर होऊ नये म्हणून महापालिकेने घनकचरा व्यवस्थापनासाठी वेगवेगळे प्रकल्प हाती घेतले. त्यात कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर आणखी तसा आणखी एक प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्प (डीबीओटी) तत्त्वावर उभारण्याचे नियोजन असल्याचे कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांनी सांगितले.

मोशीतील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विविध प्रकल्प राबविले जात आहेत. एकात्मिक कचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. कचऱ्याचे ऊर्जेत व पुनर्वापरयोग्य घटकांमध्ये रूपांतर केले जात आहे. हा उपक्रम शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. डेपोवरील ताण कमी होऊन पर्यावरण संरक्षणास मोठी मदत होत आहे. या सर्व प्रकल्पांची कार्यक्षमता वाढविण्यात येणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### वेस्ट टू एनर्जी प्रकल्प दृष्टिक्षेपात...

» एक हजार टन सुका कचरा जाळण्याची क्षमता
» दररोज २७ मेगावॅट वीजनिर्मिती
» १५०० टन क्षमतेचे मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी केंद्र
» महापालिकेचा २०० कोटी रुपयांचा हिस्सा
» एक हजार ५० कोटींचा अपेक्षित खर्च
» केंद्र व राज्य शासनाकडे निधीसाठी पाठपुरावा

### प्रकल्पातून १४ मेगावॅट वीजनिर्मिती

» कचऱ्यापासून वीजनिर्मितीच्या प्रकल्पात सध्या दररोज एक हजार टन कचऱ्यापासून १४ मेगावॅट वीजनिर्मिती केली जाते. ही वीज महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांसह वायसीएम रुग्णालयाला पुरवली जात आहे. त्यामुळे महापालिकेच्या वीज खर्चात मोठी बचत होते. हा प्रकल्प २१ वर्षे कालावधीसाठी आहे. हॉटेलांतील कचऱ्यापासून सीएनजी तयार केला जातो. प्लास्टिकपासून इंधन व कच्चा माल आणि ओल्या कचरापासून कंपोस्ट खत तयार केले जाते.

प्लास्टिक टू फ्युएल, बायोगॅस प्रकल्पांच्या माध्यमातून कचऱ्याचे वैज्ञानिक पद्धतीने व्यवस्थापन केले जात आहे. 'डीबीओटी' तत्त्वावर कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा दुसरा प्रकल्प राबविण्यात येणार आहे, असे पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले.

---

# पावसामुळे नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्या; महापौर रवी लांडगे यांचे आदेश

## वाहतूक विस्कळीत झाल्याने नागरिक, वाहनचालकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात झालेल्या अवकाळी पावसामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागला. अनेक ठिकाणी रस्त्यांवरील सुरू असलेली खोदकामे, अपूर्ण कामे, खड्डे तसेच अपुऱ्या निचऱ्यामुळे पाणी साठले होते. वृत्तपत्र सदस्यता

तसेच, यामुळे वाहतूक विस्कळीत झाल्याने नागरिक, वाहनचालकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागले. त्यांची दखल घेऊन महापौर रवी लांडगे यांनी महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आदेश आयुक्तांना दिले आहेत.

रस्त्यांच्या गुणवत्तेसाठी त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करून घ्या. भूमिगत युटिलिटी डक्ट तयार करून वारंवार होणारी खोदकामे टाळा. सखल भागांमध्ये कायमस्वरूपी पंपिंग स्टेशन उभारण्याचा प्रस्ताव तयार करा.



नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबवून नाल्यात कचरा टाकू नये म्हणून भर द्या. कामाचा दर आठवड्याला प्रगती आढावा सादर करावा आणि कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे आदेश महापौर लांडगे यांनी आयुक्तांना दिले आहेत.

### रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करा

» महापौर लांडगे यांनी सांगितले, की शहरातील सर्व प्रमुख व अंतर्गत रस्त्यांची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत. रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी. सुरू असलेली सर्व खोदकामे सुरक्षितरीत्या बंदिस्त करुन रस्ते पूर्वस्थितीत आणण्यावर भर द्यावा. साचलेले पाणी तातडीने काढण्यासाठी पंपिंग यंत्रणा कार्यान्वित करण्यात करा. प्रमुख चौक, पूल, अंडरपास व सखल भागात विशेष पथके नियुक्त करून सतत देखरेख ठेवा. नागरिकांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद मिळावा, यासाठी 24 बाय 7 नियंत्रण कक्ष सुरू करा.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ईव्ही नोंदणीला ब्रेक

## प्रादेशिक परिवहन विभागाने प्रसिद्ध केली आकडेवारी; 2023 तुलनेत तब्बल एक हजारांनी घटली नोंदणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावरणपूरक शहर म्हणून ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरात विद्युत वाहनांच्या (ईव्ही) नोंदणीचा वेग मंदावला आहे. वाढत्या किमती, भारित (चार्ज) करण्याच्या सुविधेचा अभाव आणि लांब पल्ल्याच्या प्रवासातील अडचणींमुळे नागरिकांकडून पुन्हा पेट्रोल-डिझेलच्या वाहनांना पसंती मिळू लागली आहे.

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागात २०२३ मध्ये १७ हजार २७२ वाहनांची नोंद झाली आहे, तर २०२४ मध्ये १६ हजार ३९४ आणि २०२५ मध्ये १६ हजार १९० वाहनांची नोंद झाली आहे. विद्युत वाहनांची संख्या घटल्याचे प्रादेशिक कार्यालयाकडे झालेल्या वाहन नोंदणीवरून उघडकीस आले. महापालिकेच्या वतीने विद्युत




### ईव्ही नोंदणीला ब्रेक

» पिंपरी-चिंचवड शहरात पर्यावरणपूरक पर्याय म्हणून ओळख मिळवणाऱ्या विद्युत वाहनांच्या (ईव्ही) नोंदणीचा वेग मंदावल्याचे चित्र समोर आले आहे. वाढत्या किमती, चार्जिंग सुविधांचा अभाव आणि लांब पल्ल्याच्या प्रवासातील अडचणींमुळे नागरिक पुन्हा पेट्रोल-डिझेल वाहनांकडे वळत आहेत. प्रादेशिक परिवहन विभागाच्या आकडेवारीनुसार २०२३ ते २०२५ या कालावधीत नोंदणीमध्ये घट झाली आहे. महापालिकेकडून चार्जिंग स्थानकांसाठी प्रयत्न सुरू असले तरी प्रतिसाद कमी मिळत आहे. त्यामुळे ईव्हीचा प्रसार अपेक्षित वेगाने होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

वाहनांसाठी शहरात २१ ठिकाणी चार्जिंग स्थानके उभारण्यासाठी मागील चार वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. मात्र, त्याला ठेकेदाराचा प्रतिसाद मिळत नाही. त्यासाठी महापालिका चौथ्यांदा निविदा प्रसिद्ध करणार आहे.

पेट्रोल-डिझेल वाहनांच्या तुलनेत विद्युत वाहनांची किंमत अधिक आहे. त्यामुळे मध्यमवर्गीयांना वाहन घेणे अवघड होते. लांब अंतराचा प्रवास करताना बॅटरीची मर्यादा कमी राहणे अडचणीचे ठरते. शहरात भारित (चार्ज) स्थानकांचा अभाव आहे. भारितसाठी (चार्ज) अधिकचा वेळ लागतो. त्यामुळे नोंदणी घटल्याचा अंदाज प्रादेशिक परिवहन विभागाने वर्तविला आहे.

### नोंदणी घटण्याची कारणे

» पेट्रोल-डिझेल वाहनांच्या तुलनेत विद्युत वाहनांची किंमत अधिक आहे. त्यामुळे मध्यमवर्गीयांना वाहन घेणे अवघड होते. लांब अंतराचा प्रवास करताना बॅटरीची मर्यादा कमी राहणे अडचणीचे ठरते. शहरात भारित (चार्ज) स्थानकांचा अभाव आहे. भारितसाठी (चार्ज) अधिकचा वेळ लागतो. त्यामुळे नोंदणी घटल्याचा अंदाज प्रादेशिक परिवहन विभागाने वर्तविला आहे.

> भारितसाठी (चार्ज) लागणारा वेळ, स्थानकांची कमतरता, लांब पल्ल्यासाठी वापरता येत नसल्याने शहरात विद्युत वाहनांची खरेदी कमी होत आहे. इतर वाहनांच्या तुलनेत दरदेखील अधिक आहेत. त्यामुळे विद्युत वाहनांची खरेदी घटली झाली आहे.
>
> - राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड

# पिंपळे सौदागरला मिळणार स्वतंत्र पोलीस ठाणे; सुरक्षा कवच होणार भक्कम

## आमदार शंकर जगताप व शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत आयटी हब आणि वेगाने विकसित होणारे नागरी क्षेत्र अशी ओळख निर्माण झालेल्या पिंपळे सौदागर परिसराच्या सुरक्षिततेसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पिंपळे सौदागरसाठी आता स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर होण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, पोलीस आयुक्तालयाने तसा अधिकृत प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे. आमदार शंकर जगताप आणि भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अथक पाठपुराव्यामुळे पिंपळे सौदागरकरांची ही अनेक वर्षांची मागणी आता पूर्णत्वास येत आहे

पिंपळे सौदागर हे शहर केवळ पिंपरी-चिंचवडच नव्हे, तर राज्यातील एक महत्त्वाचे निवासी आणि व्यावसायिक केंद्र बनले आहे. या भागातील



मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या, शाळा आणि वाढती लोकसंख्या पाहता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याची नितांत गरज होती. सध्या या भागाला जवळच्या पोलीस ठाण्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याने पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब होत असे. ही अडचण लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनी यासाठी विशेष प्रयत्न केले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी स्थानिक नागरिकांच्या भावना आणि सुरक्षेचा प्रश्न वारंवार प्रशासकीय बैठकीत मांडला होता. आमदार शंकर जगताप यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून थेट गृह मंत्रालयाकडे हा विषय लावून धरला होता. या दोघांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे पोलीस आयुक्तालयाने केवळ नवीन पोलीस ठाण्यांचाच नाही, तर प्रशासकीय सुलभतेसाठी नवीन 'परिमंडळ ४'चा प्रस्तावही दिला आहे.

त्वरित प्रतिसाद: पिंपळे सौदागरमध्ये स्वतःचे पोलीस ठाणे असल्याने पोलिसांची गस्त वाढेल आणि कोणत्याही तक्रारीवर त्वरित कारवाई होईल.

गुन्हेगारीवर वचक: चेन स्नॅचिंग, घरफोडी आणि वाहतूक कोंडी यांसारख्या स्थानिक समस्यांवर कडक नियंत्रण मिळवणे सोपे होईल. नागरिकांना सोय: पोलीस तक्रारीसाठी किंवा इतर कामांसाठी नागरिकांना लांबच्या पोलीस ठाण्यात जाण्याची गरज भासणार नाही.

### काय होईल फायदा?

» त्वरित प्रतिसाद: पिंपळे सौदागरमध्ये स्वतःचे पोलीस ठाणे असल्याने पोलिसांची गस्त वाढेल आणि कोणत्याही तक्रारीवर त्वरित कारवाई होईल. गुन्हेगारीवर वचक: चेन स्नॅचिंग, घरफोडी आणि वाहतूक कोंडी यांसारख्या स्थानिक समस्यांवर कडक नियंत्रण मिळवणे सोपे होईल. नागरिकांना सोय: पोलीस तक्रारीसाठी किंवा इतर कामांसाठी नागरिकांना लांबच्या पोलीस ठाण्यात जाण्याची गरज भासणार नाही.

> "पिंपळे सौदागरचा विकास झपाट्याने झाला आहे, मात्र त्यासोबतच नागरिकांच्या सुरक्षेला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. येथील वाढती लोकसंख्या लक्षात घेता स्वतंत्र पोलीस ठाणे मिळावे, ही आमची जुनी मागणी होती. आमदार शंकरशेठ जगताप यांच्या सोबतीने आम्ही केलेल्या पाठपुराव्यामुळे आज हे शक्य झाले आहे. यामुळे सौदागरमधील माता-भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि व्यावसायिक अधिक सुरक्षित अनुभवतील."
>
> - शत्रुघ्न (बापू) काटे, शहराध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड.

# शहरी गरीब आरोग्य योजनेत दिलासा; मिळकतकर अट रद्द

## हजारो गरजू नागरिकांना उपचारांचा लाभ अधिक सुलभ; महापालिकेचा महत्त्वपूर्ण निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने घेतला आहे. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नावाने सुरू असलेल्या शहरी गरीब आरोग्य योजनेतून मिळकत कर भरण्याची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे हजारो गरजू नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ अधिक सुलभपणे मिळणार आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ही माहिती दिली.

पूर्वी या योजनेचा गैरवापर टाळण्यासाठी काही निकष लागू करण्यात आले होते. त्यामध्ये वार्षिक पाच हजार रुपयांपेक्षा अधिक मिळकत कर भरणाऱ्या नागरिकांना योजनेचा लाभ नाकारण्याची अट होती. मात्र, प्रत्यक्षात या निकषामुळे अनेक पात्र आणि गरजू नागरिकदेखील योजनेपासून वंचित राहत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. शहरातील बदलती आर्थिक परिस्थिती आणि वाढती महागाई लक्षात घेता ही अट अव्यवहार्य ठरत असल्याचे स्पष्ट झाले.

शहरी गरीब आरोग्य योजना ही विशेषतः कमी उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी महत्त्वाची मानली जाते. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख ६० हजार रुपयांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबांना खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी आर्थिक मदत देण्याची तरतूद या योजनेत आहे. महागड्या उपचारांपासून वंचित राहणाऱ्या नागरिकांना मदतीचा हात देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

सध्या या योजनेअंतर्गत विविध आजारांवरील उपचारांसाठी जास्तीत जास्त १ लाख रुपयांपर्यंत खर्च दिला जातो. तर हृदयविकार, कर्करोग आणि मूत्रपिंड विकारांसारख्या गंभीर आजारांसाठी २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य मिळते. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचार घेऊ न शकणाऱ्या रुग्णांना मोठा आधार मिळत आहे.




### निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत

» या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून सामाजिक संघटना आणि नागरिकांनी याला सकारात्मक पाऊल म्हणून पाहिले आहे. आरोग्य हा मूलभूत हक्क मानून घेतलेल्या या निर्णयामुळे शहरातील शहरी गरीबांना आरोग्य सुविधा अधिक परवडणाऱ्या आणि सहज उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकंदरीत, मिळकत कराची अट रद्द केल्यामुळे शहरी गरीब आरोग्य योजना अधिक सर्वसमावेशक होणार असून, तिचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### प्रस्तावावर झाली सविस्तर चर्चा

» दरम्यान, मिळकत कराची अट लागू केल्यानंतर काही प्रमाणात गैरवापरावर नियंत्रण मिळवता आले असले, तरी अनेक खऱ्या अर्थाने गरजू नागरिकांना त्याचा फटका बसत होता. परिणामी, योजनेचा मूळ उद्देशच काही प्रमाणात बाधित होत असल्याची भावना व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर भाजपचे नगरसेवक बाळा ओसवाल यांनी ही अट रद्द करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मांडला. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि अखेर समितीने एकमताने हा निर्णय मंजूर केला..

### आरोग्य सेवेसाठी आर्थिक मदत वाढ

» ही योजना कमी उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. वार्षिक १.६० लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना खासगी रुग्णालयांत उपचारासाठी आर्थिक मदत दिली जाते. सामान्य आजारांसाठी १ लाख रुपये, तर हृदयविकार, कर्करोग आणि मूत्रपिंड विकारांसाठी २ लाख रुपयांपर्यंत सहाय्य दिले जाते. या निर्णयामुळे अधिक नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळणार आहे.

# महापालिका हद्दीतील सर्व 'आरएमसी प्लांट' बंद करण्याचा प्रस्ताव

## सर्व आरएमसी प्लांट बंद करण्याचा प्रस्ताव भाजप नगरसेवक हरिदास चरवड यांनी स्थायी समितीला दिला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाढते वायू प्रदूषण आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता, महापालिका हद्दीतील सर्व आरएमसी प्लांट बंद करण्याचा प्रस्ताव भाजप नगरसेवक हरिदास चरवड यांनी स्थायी समितीला दिला आहे. रहिवासी क्षेत्रातील हे बेकायदा प्रकल्प नागरिकांच्या आरोग्यासाठी घातक ठरत असल्याचे त्यांनी यात नमूद केले आहे.

शहरातील वाढत्या वायू प्रदूषण आणि वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या हद्दीतील सर्व काँक्रिट रेडिमिक्स (आरएमसी) प्लांट बंद करण्यात यावेत,' असा प्रस्ताव स्थायी समितीला देण्यात आला आहे. भाजपचे नगरसेवक हरिदास चरवड यांनी हा प्रस्ताव दिला असून, स्थायी समितीच्या पुढील बैठकीत त्यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.

'शहरातील अनेक रहिवासी भागांमध्ये सिमेंट काँक्रिट रेडिमिक्स (आरएमसी) प्लांट्स बेकायदा सुरू आहेत. त्यामुळे शहरातील वायू प्रदूषणाबरोबरच वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका वाढला आहे. 'रहिवासी भागांमध्ये औद्योगिक स्वरूपाचे उपक्रम चालविणे नियमबाह्य आहे. आरएमसी प्लांट्समधून निर्माण होणारे सिमेंटचे सूक्ष्म कण आणि धूळ हवेत मिसळून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करत आहेत. त्यामुळे श्वसनाचे आजार वाढण्याची शक्यता असल्याने हे सर्व प्लांट बंद करावेत,' असे चरवड यांनी या प्रस्तावात नमूद केले आहे.

याशिवाय, या प्लांट्समुळे मोठ्या वाहनांची सततची वर्दळ वाढून वाहतूक कोंडी निर्माण होते, तसेच जीवघेणे अपघात घडत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. पर्यावरणीय नियम आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अटींचे उल्लंघन करून हे प्लांट्स सुरू असल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणून देतानाच महापालिकेच्या अतिक्रमण, बांधकाम आणि पर्यावरण विभागांनी संयुक्त कारवाई करून बेकायदेशीर आरएमसी प्लांट्स तातडीने लाखबंद करावेत आणि संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी. तसेच, सर्व प्लांट्सची परवानगी, पर्यावरणीय मंजुरी आणि झोनिंग नियमांची सखोल पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



> शहरातील प्रभावित भागांमध्ये हवेच्या गुणवत्तेचे नियमित तपासणी करावी. तसेच, प्रदूषण आणि अपघातांच्या घटनांची चौकशी करून जबाबदारांवर गुन्हे दाखल करावेत. भविष्यात रहिवासी भागांमध्ये अशा औद्योगिक प्रकल्पांना परवानगी देऊ नये.
>
> - हरिदास चरवड, नगरसेवक, पुणे महापालिका

# पुण्यात एप्रिलमधील विक्रमी पाऊस; 130 वर्षांचा जुना विक्रम मोडला

## दोन तासांच्या पावसाने शहरात धुमाकूळ; अनेक भागांत मुसळधार सरी

**पुणे | प्रतिनिधी**

शहर आणि परिसरात पावसाने गुरुवारी सुमारे दोन तास अक्षरश: धुमाकूळ घालून एप्रिलमधील एका दिवसातील सर्वाधिक पावसाचा १३० वर्षे जुना विक्रम मोडीत काढला. पुण्यातील शिवाजीनगर येथे ४ एप्रिल १८९६ रोजी ५१.१ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला होता. हा एप्रिलमध्ये एका दिवसात पडलेला आतापर्यंतचा सर्वाधिक पाऊस होता. तो गुरुवारी ओलांडला जाऊन ६५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तमिळनाडू ते महाराष्ट्रादरम्यान द्रोणीय रेषा आहे. हवेच्या वरच्या स्तरात पाच ते दहा किलोमीटरवर असणारा थंड हवेचा झोत (जेट स्ट्रीम) खाली आला असून, तो दक्षिणकडे सरकला आहे. अशा वेळी हवेतील आर्द्रता वाढून वादळी पाऊस आणि गारपिटीसाठी पोषक स्थिती निर्माण होते. गेल्या काही दिवसांपासून पुण्यासह राज्यात अशी स्थिती निर्माण झाली आहे.



### बदलत्या हवामानाचा परिणाम

» हवामान विभागाच्या माहितीनुसार, तमिळनाडू ते महाराष्ट्र दरम्यान असलेल्या द्रोणीय रेषा आणि जेट स्ट्रीममुळे ही स्थिती निर्माण झाली. त्यामुळे आर्द्रता वाढून वादळी पाऊस आणि गारपीट झाली. पुण्यात गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदल होत असून, ३० मार्चला गारपीटही झाली होती. कात्रज, बाणेर, कोथरूड, औंध, बिबवेवाडी आदी भागांत जोरदार पावसाची नोंद झाली.

शहरात ३० मार्च रोजी बाणेरसह काही ठिकाणी गारपीट झाली होती, तर काही ठिकाणी जोरदार पावसाची नोंद झाली. शिवाजीनगर येथे नोंदवला गेलेला २६.६ मिलिमीटर पाऊस मार्चमधील दशकभरातील सर्वाधिक ठरला. तसेच, बुधवारीही शहरात बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला.

या पार्श्वभूमीवर, गुरुवारी दुपारी दोन वाजल्यानंतर शहरातील वातावरण बदलण्यास सुरुवात झाली. आकाश ढगांनी व्यापले आणि अंधारून आले. विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह जोरदार पाऊस सुरू झाला. जोडीला सोसाट्याचा वाराही वाहत होता. शहरातील मध्यवर्ती पेठा, कात्रज, औंध, बाणेर, बिबवेवाडी, कोथरूड, शिवाजीनगर, उंड्री अशा बहुतांश ठिकाणी दोन तासांहून अधिक काळ पावसाने जोरदार हजेरी लावली.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सर्वाधिक पाऊस एनडीए येथे ८४ मिलिमीटर नोंदवला गेला. शिवाजीनगर येथे ६५, हडपसर येथे ४२.५, पाषाण येथे ३६.३, दापोडी येथे २९, चिंचवड येथे २८.५, तर लोहगाव येथे २१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

### एप्रिलमधील विक्रमी पावसाची नोंद

» पुणे शहरात गुरुवारी झालेल्या जोरदार पावसाने एप्रिल महिन्यातील १३० वर्षांचा विक्रम मोडला. शिवाजीनगर येथे ६५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली, तर यापूर्वी ४ एप्रिल १८९६ रोजी ५१.१ मिलिमीटर पाऊस हा विक्रम होता. अवघ्या दोन तासांत शहरातील अनेक भागांत मुसळधार पाऊस झाला. एनडीए येथे सर्वाधिक ८४ मिमी पाऊस नोंदवला गेला. या अनपेक्षित पावसामुळे शहरातील वातावरणात मोठा बदल झाला.

> सध्या वादळी पाऊस, गारपिटीसाठी पोषक स्थिती आहे. आणखी दोन ते तीन दिवस ही स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. तसेच, या स्थितीची तीव्रता पूर्वेकडे सरकून मध्य महाराष्ट्रातील काही जिल्हे, मराठवाडा, विदर्भात पाऊस, गारपिटीची शक्यता आहे .
>
> - एस. डी. सानप, हवामानशास्त्रज्ञ, भारतीय हवामानशास्त्र विभाग

# अवकाळी पावसाचा फटका; पुणे जिल्ह्यात 1532 हेक्टरवरील पिकांचे नुकसान

## इंदापूर व पुरंदर तालुक्यांत सर्वाधिक नुकसान नोंद; गहू, कांदा, डाळिंबसह विविध पिकांना मोठा फटका

**पुणे | प्रतिनिधी**

मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात गारपिटीसह झालेल्या अवकाळी पावसामुळे पुणे जिल्ह्यातील शेतीपिकांना मोठा फटका बसला असून, आठ तालुक्यांतील 69 गावांमधील तब्बल 1532 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या आपत्तीमुळे 3682 शेतकरी बाधित झाले असून, पंचनामे करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले.

18 व 19 मार्च रोजी झालेल्या मुसळधार अवकाळी पावसासह गारपिटीने पुरंदर, इंदापूर, हवेली, भोर, दौंड, राजगड, शिरूर आणि बारामती या तालुक्यांतील पिकांचे मोठे नुकसान झाले. या



पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले होते. त्यानुसार महसूल व कृषी विभागाकडून नुकसानीचा आढावा घेण्याचे काम सुरू आहे.

जिल्ह्यातील गहू, कांदा, डाळिंब, भाजीपाला, काकडी, कलिंगड, हरभरा, केळी, चारापिके, तसेच फुलपिकांना या अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. विशेषत: इंदापूर आणि पुरंदर तालुक्यांमध्ये सर्वाधिक नुकसान नोंदविण्यात आले आहे. इंदापूर तालुक्यात 646 हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली असून, 1269 शेतकरी प्रभावित झाले आहेत. तर, पुरंदर तालुक्यात 389.80 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान होऊन 1283 शेतकरी अडचणीत आले आहेत.

हवेली तालुक्यात 170 हेक्टर, दौंडमध्ये 110.20 हेक्टर, शिरूरमध्ये 93 हेक्टर, भोरमध्ये 78 हेक्टर आणि बारामतीत 41.70 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. काही तालुक्यांमध्ये नुकसानीचे प्रमाण तुलनेने कमी असले, तरी शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसल्याचे चित्र आहे.

अवकाळी पावसामुळे पुणे जिल्ह्यातील शेतीपिकांना मोठा फटका बसला असून, आठ तालुक्यांतील 69 गावांमधील तब्बल 1532 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. दरम्यान, जिल्ह्यात पुढील काही दिवसांतही अवकाळी पावसाची शक्यता वर्तविण्यात येत असून, नुकसानीचा अंतिम अहवाल लवकरच सादर केला जाईल, अशी माहिती प्रशासनाने दिली. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, अशी मागणीही पुढे येत आहे.

### तालुकानिहाय नुकसानीचा आढावा

» या अवकाळी पावसाचा गहू, कांदा, डाळिंब, भाजीपाला, काकडी, कलिंगड, हरभरा, केळी आणि फुलपिकांवर मोठा परिणाम झाला आहे. इंदापूर तालुक्यात 646 हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, 1269 शेतकरी प्रभावित आहेत. पुरंदर तालुक्यात 389.80 हेक्टर नुकसान नोंदले गेले आहे. हवेली, दौंड, शिरूर, भोर आणि बारामतीतही मोठा फटका बसला आहे. पुढील काही दिवसांतही अवकाळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.